# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 127/2023 दिनांक : 28.03.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :-

**1) भाग्यनगर :-**दिनांक 25.03.2023 रोजी 23.15 वा. चे सुमारास, **वामनराव पावडे मंगल कार्यालय समोर लोकमित्रनगर कडे जाणारे रोडवर, नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे मित्रासोबत जेवन करून परत मरळक येथे जात असतांना यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन वामनराव मंगल कार्यालय समोर रोडवर फिर्यादीची मोटार सायकल आडवुन फिर्यादीस शिवीगाळ करून जिवे मारण्याच्या उदेशाने दगडाने डोक्याला मारहाण करून गंभीर दुखापत करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी गंगाधर धोंडीबा कदम, वय 54 वर्षे, व्यवसाय शेती रा. मरळक ता. जि. नांदेड ह.मु. लोकमित्रनगर नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन **123/2023 कलम** 307,324,141,143,147,148, 149,504 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री चव्हाण, मो.नं. 7020408595** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :-

**1)लोहा :-** दिनांक 23.03.2023 रोजी 21.00 वा. ते दिनांक 24.03.2023 रोजी 06.00 वा चे दरम्यान, **लोहा ते पालम जाणारे रोडवर बालाजी प्रोव्हिजन स्टोअर्स समोर लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो. सा. क्रमांक एमएच-20/सिएम-9398 किंमती 30,000/-रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी बब्रुवाहन भिकाजी रोडे, वय 52 वर्षे, व्यवसाय पेंटर रा. जिरेवाडी ता. परळी जि. बीड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरन 70/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2323 जामकर, मो. क्रं.9970975476** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :-** दिनांक 27.03.2023 रोजी 14.00 वा. चे सुमारास, **ग्रामिण तंत्रनिकेतन कॉलेजचे पाठीमागील गेटचे जवळ जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची ॲक्टीव्हा 5 जी कंपनीची स्कुटी क्रमांक एमएच-26/बिपी-0402 किंमती 40,000/-रूपयाची नमुद ठिकाणावरून कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. वगैरे **फिर्यादी काजन बाबुसिंग गाडीवाले, वय 19 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. अबजलनगर ता.जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 211/2023 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/173 माने, मो. क्रं. 8788371187** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :-

**मुखेड :-**सन 2019 पासुन ते आज पावेतो फिर्यादीचे सासरी गुंटुर व तांदळी येथे, **ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझ्या नवऱ्याच्या आजारामुळे आम्हाला शेती विकावी लागली तु माहेरहुन लोकांची बाकी देण्यासाठी पैसे आन म्हणुन पैशाची मागणी करून मारहाण व शिवीगाळ करून शारिरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 29 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 82/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/वाघमारे, मो.क्रं. 9923481762** हे करीत आहेत.

## 4)अपघात :-

**अर्धापुर :-** दिनांक 22.03.2023 रोजी 12.30 वा. चे सुमारास, **वारंगाफाटा ते नांदेड रोडवर पार्डी येथील दत्त मंदिर समोरील हायवेचे सार्वजनिक रोडवर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे गणेश अनसाजी नरवाडे, वय 20 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. कापसी बु. ता. लोहा जि. नांदेड** यास कार क्रं एमएच-26/बीक्यू-1572 च्या चालकाने आपले वाहन हयगय व निष्काळजीपणाणे भरदाव वेगात चालवुन यातील मयताचे मो. सा. एमएच 26/4257 हीस पाठीमागुन जोराची धडक दिल्याने यातील मयताला गंभीर दुखापत होवुन तो मरण पावला आहे. त्याचे मरणास यातील आरोपी कारचालक हा कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी मिनाक्षी अनसाजी नरवाडे, वय 36 वर्षे, व्यवसाय घरकाम रा.कापसी बुद्रुक ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं. 90/2023 कलम 279, 338, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/आगलावे, मो.क्र 9823143245** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :-

**भाग्यनगर :-**दिनांक 26.03.2023 रोजी 23.10 वा. चे सुमारास, **लालबहादुर शास्त्री शाळेजवळ नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक लोखंडी तलवार किंमती 500/- रूपयाची एका काळया रंगाची महीन्द्रां कंपनीची स्कॉपिओ किंमती 4,00,000/-रूपयाची सह ताब्यात बाळगलेला मिळुन आले व मा. जिल्हादंडाधिकारी साहेब, नांदेड यांचे जमावबंदी व शस्त्र बंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/516 हनवता सोपानराव कदम, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 125/2023 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा सह कलम 135 म.पो.अ. व 34 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2178 गोणारकर, मो.क्रं. 9689715358** हे करीत आहेत.

## 6)जुगार :—

**1)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 27.03.2023 रोजी 20.20 वा. चे सुमारास, **चंदासिंग कॉर्नर महींद्रा शोरूमचे पाठीमागे खानसोळे यांचे शटर समोर जि.नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 1760/—रुपये व दोन मोबाईल एकुण किंमती 13,000/— रूपयाचे तसेच चार मोटार सायकल एकुण किंमती 1,95,000/— रूपयाच्या असा एकुण किंमती 2,09,760/रूपयाचा मुद्येमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/359 राजु किशनराव हुमनाबादे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 212/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/113 मुसळे मो.क्रं. 9021745113** हे करीत आहेत.

**2)वजिराबाद :—** दिनांक 27.03.2023 रोजी 17.05 वा. चे सुमारास, **संजय वाईन मार्टच्या गल्लीत जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीने विना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 2290/—रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/152 मनोज बापुसिंह परदेशी, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 89/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/राठोड मो.क्रं. 9884884669** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :—

**धर्माबाद :—** दिनांक 27.03.2023 रोजी 18.10 वा. चे सुमारास, **बाचेगाव फाटा ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने विना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 2000/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/सुभाष बाबाराव मुंगल, ने. पोस्टे धर्माबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरन 61/2022 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/ आडे, मो.नं. 9923692588** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 128 / 2023 दिनांक : 28.03.2023

## राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत नांदेड जिल्हा पोलीस दलातील पोलीस अंमलदारांचे यश

मास्टर्स गेम्स फेडरेशन, उत्तर प्रदेश यांच्याद्वारे नाशिक येथे आयोजीत 5 व्या राष्ट्रीय मास्टर्स जलतरण स्पर्धेत नांदेड जिल्हा पोलीस दलातील अंमलदार जयप्रकाश मोतीराम क्षीरसागर व रामेश्वर राजकुमार जाधव यांनी एकुण 6 पदकाची कमाई केली.

मास्टर्स गेम्स फेडरेशन, उत्तर प्रदेश यांनी नाशिक येथे दिनांक 18 व 19 मार्च रोजी 5 व्या राष्ट्रीय मास्टर्स जलतरण स्पर्धेचे आयोजन विर सावरकर जलतरणीका, नाशिक येथे केले होते. या स्पर्धेत 10 राज्यातील 350 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यात महाराष्ट्र राज्यातील संघात सहभागी असलेल्या नांदेड जिल्हा पोलीस दलातील अंमलदार जयप्रकाश मोतीराम क्षीरसागर यांनी 50 मीटर फ्रीस्टाईल प्रकारात गोल्ड मेडल, 50 मीटर बटरफ्लाय प्रकारात गोल्ड मेडल व 200 मीटर वैयक्तीक मीडले रीले प्रकारात गोल्ड मेडल असे एकुण तिन सुवर्ण पदकांची कमाई केली तर पोलीस अंमलदार रामेश्वर राजकुमार जाधव यांनी 50 मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात गोल्ड मेडल, 100 मीटर ब्रेस्ट स्ट्रोक प्रकारात गोल्ड मेडल व 50 मीटर फ्रीस्टाईल प्रकारात ब्रॉन्झ मेडल पटकावत एकुण तिन मेडल्सची कमाई केली.

या यशाबद्दल **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधीक्षक, नांदेड, **मा. श्री अबिनाश कुमार**, अपर पोलीस अधीक्षक, नांदेड, **श्रीमती अश्विनी जगताप**, पोलीस उप अधीक्षक (गृह) नांदेड, पोलीस अधीक्षक यांचे स्विय सहायक **श्री व्यंकट वडजे**, **श्री शिवाजी लष्करे**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, पोलीस अधीक्षक यांचे वाचक **श्री अशोक देशमुख** यांनी सदर अंमलदारांचे कौतुक करून अभिनंदन केले व पुढील स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


महाराष्ट्र पोलीस
TECNO
POVA